# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई-४०० ०२१
दूरध्वनी क्र. : २२०२६२४९, २२८३५२४७ फॅक्स : २२०२९३४८
ई.मेल पत्ता: mstmjp@rediffmail.com
caomjp@rediffmail.com
वेब पत्ता : mahajeevan.com

क्र.मजीप्रा/सस/आस्था-४/ ५९९ दिनांक : ५ जून, २००६.

विषय : **दिनांक २५ मे, २००६ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १०४ व्या सभेचे इतिवृत्त.**

दिनांक २५ मे, २००६ रोजी दुपारी ४.३० वाजता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची १०४ वी सभा संपन्न झाली. सदर सभेचे इतिवृत्त मान्यतेसाठी या पत्रासोबत सादर करण्यात येत आहे. कृपया सदर इतिवृत्तास मान्यता मिळावी, ही विनंती.

**सोबत : इतिवृत्त**

**( माधव दोमकोंडवार )**
**सदस्य सचिव**

**प्रधान सचिव,**
**पा.पु. व स्व.विभाग :**

**मा. मंत्री,**
**पाणी पुरवठा व स्वच्छता,**
**तथा अध्यक्ष, म.जी.प्रा. :**

B.M.103/560

13.6.2006

**(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)**
**पाणी हे जीवन आहे ! पाण्याची बचत करा!**

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १०४ व्या सभेचे इतिवृत्त

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची १०४ वी सभा मा. मंत्री, जलसंपदा, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा म.जी.प्रा.चे पदसिध्द अध्यक्ष, मा. श्री. अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २५ मे, २००६ संध्याकाळी ४.३० वाजता संपन्न झाली. या सभेस मजीप्राचे खालील सदस्य उपस्थित होते.

मा. श्री.अजित पवार, मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष.
मा. श्री. राजेश टोपे, राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष.
श्री. विश्वास धुमाळ, प्रधान सचिव, पा.पु. व स्व. विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य.
श्री. जे. एम. फाटक, प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य.
श्री. माधव दोमकोंडवार, सदस्य सचिव, म.जी.प्रा., मुंबई.
प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा), वित्त विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य यांचे वतीने श्री. शि. म. म्हात्रे, (उप सचिव वित्त) वित्त विभाग.
प्रधान सचिव (उर्जा) उद्योग, उर्जा कामगार विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य यांचे वतीने श्री. प्र. ना. मुदखेडकर, (उप सचिव उर्जा) उर्जा विभाग.

या व्यतिरिक्त सदर सभेस खालील मजीप्राचे अधिकारी तसेच इतर विभागाचे पदाधिकारी उपस्थित होते.

श्री. राजेंद्र होलानी, मुख्य अभियंता, म.जी.प्रा., पुणे व नाशिक.
श्री. सागर रानडे, मुख्य अभियंता, म.जी.प्रा., औरंगाबाद.
श्री. ए. एन. इंगळे, मुख्य अभियंता, म.जी.प्रा., अमरावती.
श्री. व्ही. आर. कल्याणकर, प्रभारी मुख्य अभियंता, म.जी.प्रा., ठाणे तथा विशेष कार्य अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
श्री. प्र. वा. पांढरीपांडे, वि.स. व मु.ले.अ., म.जी.प्रा., नवी मुंबई.
श्री. बा. शि. पाटील, उप-मु.ले.अ., म.जी.प्रा., नवी मुंबई.
श्री. सु. पु. भातखंडे, कायदा व कामगार अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी. म.जी.प्रा., मुंबई.

मा. मंत्री, जलसंपदा, पा.पु. व स्व. तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सभेस सुरूवात झाली.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र. १ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १०३व्या सभेच्या प्रारुप इतिवृत्तास मान्यता देणे.**

दिनांक २८ मार्च, २००६ रोजी झालेल्या १०३ व्या सभेच्या इतिवृत्तास सर्वसाधारण चर्चेनंतर मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र. २ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १०३व्या सभेतील निर्णयावर करण्यात आलेली कृती.**

मजीप्राच्या १०३ व्या बैठकीमध्ये जे निर्णय घेण्यात आले होते त्या निर्णयांच्या अनुषंगाने करण्यात आलेली कार्यवाहीबाबत मा. सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास माहिती करुन देत असताना मजीप्रांतर्गत क्षेत्रिय स्तरावरुन वर्ग-४ संवर्गातील कार्यव्ययी आस्थापना / रुपांतरीत अस्थाई / स्थाई आस्थापनावरील रु. २५५०-५५-२६६०-६०-३२००/- या वेतन श्रेणीतील संवर्गाकरिता जलसेवक हा संवर्ग निर्माण करताना या संवर्गाकरिताच्या कर्तव्य व जबाबदा-या निश्चित करुन सर्वांना कळविण्यात यावे तसेच आवश्यकतेनुसार त्यांना प्रशिक्षण देण्यात यावे असे प्रधान सचिव, पा.पु. व स्व.वि. यांनी सूचविले. मा. अध्यक्ष महोदयांनी कुळगाव-बदलापूर, अंबरनाथ शहराजवळ आयुध निर्माण कारखान्याकरिता राबविण्यात येत असलेल्या कायम स्वरुपी पाणी पुरवठा योजना, भाग-१ च्या प्रगतीपथावरील कामांची पाहणी सदस्य सचिव यांनी प्रत्यक्ष कार्यक्षेत्रावर जाऊन करावी. सदरची कामे पावसाळयापूर्वी सुरक्षित पातळीपर्यंत होतील याची काळजी घेणेबाबत संबंधितांना सूचना द्याव्यात असे निर्देश दिले. तसेच म.जी.प्रा.च्या नवी मुंबई क्षेत्रा बाहेरच्या नवी मुंबई विशेष आर्थिक क्षेत्र प्रायव्हेट लिमीटेड (NMSEZ) या भागास पाताळगंगा नदीवरुन पुरवठा करावयाच्या पाण्याचे आरक्षण १०० द.ल.लि. करिता असून सदरचे आरक्षणाची मुदत संबंधित खात्याकडून कायमस्वरुपी वाढवून घेण्याविषयी तसेच जर इतर ग्राहक पाणी घेण्यास तयार असतील तर त्याप्रमाणे आरक्षण क्षमतेत देखील वाढ करणेबाबत प्रधान सचिव तसेच मा. अध्यक्ष महोदयांनी निर्देश दिले. तद्नंतर सर्वसाधारण चर्चेनंतर करण्यात आलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र. ३ : राज्य सार्वजनिक उपक्रमाने तात्पुरत्या शिल्लक निधी गुंतविण्यासाठी सुधारित मार्गदर्शक तत्वांच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने केलेल्या गुंतवणुकीत मान्यता मिळणेबाबत.**

सदर कार्यक्रम बाबीविषयी सदस्य सचिव तसेच वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी यांनी सविस्तर माहिती संचालक मंडळासमोर विषद केली. कार्यक्रम बाबीस

| | |
|---|---|
| मा. अध्यक्ष तथा<br>मंत्री, पा.पु. व स्व. | सदस्य सचिव<br>म.जी.प्रा. |

जोडलेल्या दिनांक २३.३.२००६ ते १७.५.२००६ या कालावधीत जास्तीत जास्त व्याज दर देणाऱ्या बँकांतर्गत वेगवेगळया कालावधीकरिता करण्यात आलेल्या गुंतवणूकीस मान्यता प्रदान करण्यात आली. सदरची मान्यता प्रदान करताना पुढील बैठकीत गुंतवणूकीबाबत सादर करावयाच्या कार्यक्रम बाबीमध्ये शासन निर्णयातील मार्गदर्शक तत्वानुसार गुंतवणूक केल्याबाबतचे प्रमाणपत्रा बरोबरच प्राधिकरणाकडे अतिरिक्त असलेला निधी बँकेत शिल्लक नसल्याबाबतचे प्रमाणपत्रसुध्दा नमूद करणे आवश्यक असलेबाबतचे निर्देश मा. प्रधान सचिव, पा.पु. व स्व.वि. यांनी दिले.

**कार्यक्रम बाब क्र. ४ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीची वाशी नवी मुंबई येथील जे.एन.टाईप १ची १५निवासस्थाने ओनर्स असोसिएशनच्या माध्यमातून पुर्नबांधणी करणेबाबत..**

सदर कार्यक्रम बाबीविषयी सदस्य सचिव तसेच मुख्य प्रशासकीय अधिकारी यांनी सविस्तर माहिती संचालक मंडळासमोर विषद केली. म.जी.प्रा.च्या वाशी, नवी मुंबई येथील मालकीच्या जे.एन. १ टाईप, इमारत क्र. १०-अे, मधील १२ सदनिका व इमारत क्र. १०-बी मधील ३ सदनिका अशा एकूण १५ सदनिकांच्या शांतीकुंज ओनर्स असोसिएशनच्या माध्यमातून विकासका मार्फत पुर्नबांधणीच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, म.जी.प्रा., यांना प्राधिकृत करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र. ५ : माळपठार ४० गांवे (ता. पुसद, जि. यवतमाळ) प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेचे व्यवस्थापन, देखभाल व दुरुस्ती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने कंत्राटी उद्योजकाद्वारे करणेबाबत..**

सदर कार्यक्रम बाबीविषयी सदस्य सचिव तसेच मुख्य अभियंता, अमरावती यांनी सविस्तर माहिती संचालक मंडळासमोर विषद केली. माळपठार ४० गांवे (ता. पुसद, जि. यवतमाळ) प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेचे व्यवस्थापन, देखभाल व दुरुस्ती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने कंत्राटी उद्योजकाद्वारे करणेबाबतच्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा करण्यात येऊन कार्यक्रम बाबीद्वारे सादर करण्यात आलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. ही योजना प्राधिकरणामार्फत चालविताना पहिल्या ५ वर्षात जी काही आर्थिक तूट येईल त्याची भरपाई करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यास व त्याची प्रतिपूर्ती मागण्यासही मान्यता देण्यात आली. या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, म.जी.प्रा., यांना प्राधिकृत करण्यात येत आले.

| | |
|---|---|
| मा. अध्यक्ष तथा<br>मंत्री, पा.पु. व स्व. | सदस्य सचिव<br>म.जी.प्रा. |

**कार्यक्रम बाब क्र. ६ : शिरभावी व ८१ गावांची प्रादेशिक पाणी पुरवठा योजना, ता. सांगोला, जि.सोलापूर दैनंदिन देखभाल दुरुस्तीसाठी म.जी.प्रा.ने योजना राबवून थेट ग्राहकांकडून पाणी पट्टी वसुली करणे.**

सदर कार्यक्रम बाबीविषयी सदस्य सचिव तसेच मुख्य अभियंता, पुणे यांनी सविस्तर माहिती संचालक मंडळासमोर विषद केली. शिरभावी व ८१ गावांची प्रादेशिक पाणी पुरवठा योजना, ता. सांगोळा, जि. सोलापूर दैनंदिन देखभाल व दुरुस्तीसाठी म.जी.प्रा.ने योजना राबवून थेट ग्राहकांकडून पाणी पट्टी वसुली करणेबाबतच्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा करण्यात येऊन ही योजना म.जी.प्रा.मार्फत प्रथम १५ वर्षा कालावधीकरिता ताब्यात घेऊन चालविणेकरिता खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात आली.

ही योजना प्राधिकरणामार्फत चालविताना दारिद्रय रेषेखालील घराकरिता रु. ७५/- व दारिद्रय रेषेवरील घराकरिता रु. १००/- प्रति जोडणीकरिता दर महिन्यास आकारण्यात यावेत. तसेच सुत गिरणीकरिता व औद्योगिक वसाहतीकरिता दररोज करावयाच्या ३.५ लाख लिटर्स पाण्याकरिता रु. १७.५० प्रति १००० लिटर ऐवजी रु. २०/- प्रति १००० लिटर्स याप्रमाणे दर आकारण्यात यावेत.

ही योजना प्राधिकरणामार्फत चालविण्याकरिता दर वर्षी प्राधिकरणाला जी काही आर्थिक तुट येईल त्याची भरपाई करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यास व त्याची प्रतिपूर्ती मागण्यासही मान्यता देण्यात आली.

या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, म.जी.प्रा., यांना प्राधिकृत करण्यात येत आले.

**कार्यक्रम बाब क्र. ७ : ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत म.जी.प्रा.ने पूर्ण केलेल्या योजना स्थानिक स्वराज्य संस्थांनी हस्तांतरीत करुन न घेतलेने त्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे थेट चालविण्याबाबत निर्गमित झालेल्या शासन निर्णयात दुरुस्ती करणेबाबत.**

सदर कार्यक्रम बाबीविषयी सदस्य सचिव यांनी सविस्तर माहिती संचालक मंडळासमोर विषद केली. शासन निर्णय क्र. ग्रापापु-१००५/प्र.क्र.१३६/पापु-०७, दि. १० ऑगस्ट, २००५, मध्ये प्रस्तावित केलेप्रमाणे दुरूस्ती करण्याकरिता संचालक मंडळाची शिफारस असून या

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

पुढील कार्यवाही करण्यास तसेच प्रस्ताव शासनास सादर करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

तसेच ज्या पाणी पुरवठा योजनांकरिता ३ पेक्षा जास्त टप्प्यात पंपिंग (More Stages Pumping) करावे लागते अशा योजनांकरिता देखभाल व दुरूस्ती करिता येणारा खर्च व योजनेतून मिळणारे उत्पन्न यांचा आढावा घेऊन अशा योजनांच्या विद्युत देयकाकरिता शासनामार्फत काही अर्थसहाय्य (Subsidy) देता येईल किंवा कसे याबाबत चर्चा करणे संदर्भात मा. प्रधान सचिव, पा.पु. व स्व.वि. यांनी निर्देश दिले. तसेच मा.प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग यांनी असे निदर्शनास आणून दिले की, १२ वा वित्त आयोगाप्रमाणे ग्राम पंचायतींना देण्यात येत असलेल्या दरडोई अनुदानापैकी काही प्रमाणात अनुदान पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल दुरुस्तीसाठी वापरण्यास मुभा दिलेली आहे. ज्या गावांच्या पाणी पुरवठा योजनांच्या दैनंदिन देखभाल खर्चिक आहे. त्याठिकाणी या अनुदानाचा वापर प्राधान्याने करण्यात यावा, असे सुचविले. या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करावी असे मा.अध्यक्ष महोदय यांनी निर्देश दिले.

**कार्यक्रम बाब क्र. ८ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील कार्यव्ययी / रुपांतरीत / अतिरिक्त कर्मचाऱ्यांबाबत.**

या कार्यक्रमबाबी विषयी माहिती सादर करण्यापूर्वी अतिरिक्त CRT/CRP कर्मचा-यांची माहिती दर्शविणारा सुधारित तक्ता व सध्या देखभाल दुरुस्ती खाली असलेल्या तसेच देखभाल दुरुस्तीसाठी प्रस्तावित असणा-या नागरी व ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची यादी सर्वांना सादर करण्यात आली. या तक्त्याआधारे सध्या ३३९६ कर्मचारी कार्यरत असून यापैकी सध्या देखभाल दुरुस्ती करत असलेल्या २२ नागरी व ६२ ग्रामीण पाणी पुरवठा योजनांकरिता १८७६ कर्मचारी पुरेसे असून प्रस्तावित २ नागरी व ६२ ग्रामीण पाणी पुरवठा योजनांकरिता ७०१ कर्मचारी लागणार असले तरीसुध्दा ८१९ कर्मचारी अतिरिक्त ठरतील असे सदस्य सचिव यांनी संचालक मंडळाच्या निदर्शनास आणून दिले. यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. सदर चर्चेअंतर्गत ठाणे प्रादेशिक विभागाकरिता सध्या आवश्यक असणारे व तसेच भविष्यात देखभाल दुरुस्तीसाठी योजना चालविण्यास घेताना लागणारे वर्ग-४ चे कर्मचारी, आज ज्या प्रादेशिक विभागात अतिरिक्त आहेत तेथून बदल्या करुन उपलब्ध करुन देण्यात यावेत मात्र असे करीत असताना अतिरिक्त कर्मचारी असलेल्या पाणी पुरवठा केंद्रावरुन ज्येष्ठतम कर्मचा-यांच्या बदल्या करण्याचा निर्णय घेण्यात आला.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

अतिरिक्त कर्मचा-यांच्या बाबतीत स्वेच्छा निवृत्ती योजनेचा (VRS) लाभ देण्यासंदर्भातही चर्चा करण्यात आली. शासनाची सध्याची नियमित आस्थापनेसाठी लागू असलेली स्वेच्छा निवृत्ती योजना अस्थायी अस्थापनेसाठी सुध्दा लागू असल्यामुळे नवीन स्वेच्छा निवृत्ती योजना लागू करण्याची आवश्यकता नाही. सध्याचीच स्वेच्छा निवृत्ती योजनेबाबत विशेषत: वर्ग-४ च्या कर्मचा-यांना माहिती नसण्याची शक्यता लक्षात घेऊन याबाबतचे परिपत्रक सर्वांना पाठवावे. जेणेकरुन इच्छूक कर्मचा-यांना या स्वेच्छा निवृत्ती योजनेचा लाभ घेता येईल, असे ठरले.

**कार्यक्रम बाब क्र. ९ : आमदार निधी तसेच खासदार निधी मधुन राबवावयाच्या ग्रामीण तसेच नागरी पाणी पुरवठा योजनांच्या कामाकरितांचे ई ॲन्ड पी चार्जेस.**

सदर कार्यक्रम बाबीविषयी सदस्य सचिव तसेच वित्तीय सल्लागाार व मुख्य लेखा अधिकारी यांनी सविस्तर माहिती संचालक मंडळासमोर विषद केली. त्यावर प्रस्तावित केलेप्रमाणे आमदार निधीमधून प्राधिकरणामार्फत करावयाच्या ग्रामीण तसेच नागरी पाणी पुरवठा योजनांच्या कामाकरिता नियोजन विभागाप्रमाणे ५% इ ॲन्ड पी चार्जेस आकारण्यास मान्यता देण्यात आली. या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

उपरोक्तप्रमाणे निर्देश दिल्यानंतर मा. अध्यक्ष महोदय, मा. प्रधान सचिव, पा.पु. व स्व.वि. यांनी कंत्राटदारांनी पाणी पुरवठा योजनांकरिता खराब पाईप्स पुरवठया केल्यामुळे योजनेतून होणाऱ्या पाण्याच्या गळतीमुळे जनमाणसात प्राधिकरणाची प्रतिमा दिवसेंदिवस खराब होत असल्याचे नमूद केले. यावर जे कंत्राटदार स्वीकृत निविदेतील अटी व शर्तीप्रमाणे गुणवत्ता पूर्वक पाईप्सचा पुरवठा करणार नाहीत, जे कंत्राटदार कामाची गुणवत्ता राखणार नाहीत व ज्या कंत्राटदारांनी पूर्ण केलेल्या योजना दोषांचा उत्तर दायीत्व कालावधीत (Defect Liability Period) व्यवस्थीतरित्या चालत नाहीत अशा कंत्राटदारांची नावे काळया यादीत टाकण्यात यावीत व या अनुषंगाने कार्यवाही सदस्य सचिव यांनी करावी. असे निर्देश दिले.

संचालक मंडळासमोर चर्चेकरिता आणखी विषय नसलेमुळे उपस्थितांचे आभार मानून बैठक संपल्याचे मा. अध्यक्ष यांनी घोषित केले.



| | |
|---|---|
| मा. अध्यक्ष तथा | सदस्य सचिव |
| मंत्री, पा.पु. व स्व. | म.जी.प्रा. |